# मराठवाडा नेता

संपादकः प्रा. रामेश्वर बद्दर रेणापूरकर

दै. मराठवाडा नेता
२९ वा
वर्धापन दिन विशेषांक

## वर्धापन दिन
## व
## जागतिक मंदी
## विशेषांक



वर्धापन विशेषांक २००९

# अंतरंग


1 भारतात मंदी नव्हे, इकॉनॉमिक स्लो डाऊन — डॉ. नरेंद्र जाधव

3 अन्वयार्थ जागतिक मंदीचा — पद्मश्री डॉ. भंवरलाल जैन

7 भारतीय बँका वाचल्या कशा? — विशाल शुक्ल

10 अन् आयटीचा रुबाब गेला ! — उदय देशपांडे

12 ... आणि मंदीतही प्रगती केली ! — फ्रान्सिस्को डिसोझा

14 मागणी वाढवा मंदी घालवा — डॉ. भा. र. साबडे

19 लेहमन ब्रदर्सची दिवाळखोरी आणि मंदी — मिलिंद सोलापूरकर

23 अक्कल वापरा, मंदी पळवा — मोहमद पाशा

26 भारतात मंदी होती कुठे? — राज घेल

29 मंदीमुळे पेपर उद्योग संकटात — हर्षल शहा

31 बांधकाम क्षेत्र आणि जागतिक मंदी — विकास वर्तक

34 मंदी म्हणजे... — हर्षदा साधले

37 मंदीची कालगणना — स्वप्नील कुलकर्णी

40 मंदीच्या मुळाशी... — डॉ. भारत झुनझुनवाला

43 प्रवाशांवर मंदीचे गडद सावट — सुभाष वैद्य

46 विदेशी पर्यटनाला फटका अधिक — विश्वजित पाटील

48 अंगभूत मर्यादांचे संरक्षक कवच — अभय टिळक

53 ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जागतिक मंदी — जयंती घोष

56 भारतात मंदीपेक्षा भीतीच अधिक — गिरिश वासुदेव

60 भारतातील 'आयटी'चे काय होणार? — डॉ. अच्युत गोडबोले

64 आजच्या आत्मपरिक्षणात उद्याची उमेद — हर्ष काबरा

# संपादकीय...

गेली २८ वर्षे दै. मराठवाडा नेता सातत्याने प्रकाशित करत असताना सर्वांना सार्थ अभिमान वाटावा अशाप्रकारची भूमिका सातत्याने दै. मराठवाडा नेताने घेतलेली आहे. आमच्यातील चांगूलपणा, नव्या नव्या कल्पना याच श्रेय वाचक, जाहिरातदार, हितचिंतक व आम्हाला सातत्याने सहकार्य करणारे, मार्गदर्शन करणारे, प्रेम करणारे, टिकाटिप्पणी करणारे तसेच दै. मराठवाडा नेता टीम मधील ऑफिस बॉयपासून ते गावा-गावातील वितरण करणारे प्रतिनिधी, पत्रकार, डी.टी.पी. ऑपरेटर, लेखक या भागातील उद्योजक, व्यापारी, प्राध्यापक, विद्यार्थी, सामाजिक, राजकीय, विविध क्षेत्रातील नेते, कार्यकर्ते यांना आम्ही देतोत. कारण दैनिक चालवण हे तस एका व्यक्तीच काम नाही.

२१ व्या शतकात भरारी घेत असताना आम्हाला सार्थ अभिमान वाटतो की, महाराष्ट्रातीलच नव्हे किंबहुना देशातील पत्रकारितेला दिशा देण्याचे काम विविध महत्वपूर्ण पावले उचलण्याचे काम दै. मराठवाडा नेता करु शकलं. मराठवाडा ही संताची भूमी आहे हे म्हणत असताना आम्ही मागासलेले आहोत म्हणून आम्ही कधीही निरुत्साही झालो नाहीत, हताश झालो नाहीत उलट येणाऱ्या अडचणी, येणाऱ्या समस्या यातून आम्ही अत्यंत संयमाने, निर्भयपणाने आणि आत्मविश्वासानं वाटचाल केलेली आहे. २८ वर्षाच सिंहावलोकन करत असताना हँडकंपोजींगपासून ते ऑफसेटपर्यंत अंक काढत असताना २ पानी पासून ते ६ पानी काढत असताना दै. मराठवाडा नेता इंटरनेट आवृत्ती यावर्षी सुरु केलेली आहे. लातुरातील वृत्त जगात कळालं पाहिजे, मराठवाडा नेतात जग सामावल पाहिजे आणि खऱ्या अर्थाने 'हे विश्वची माझे घरं' या संकल्पनेतून आम्ही वाटचाल करत आहोत. ही वाटचाल करत असताना वेगवेगळे संग्रही ठेवावे असे विशेषांक आम्ही प्रकातिश केलेले आहेत.

वर्धापन दिनानिमित्त आम्ही जागतिक मंदीच्या संदर्भात विशेषांक काढण्याचे ठरवल. याकामी आदित्य फिचर्स, पुणे चे सुधीर मोकाशे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी आम्हाला देशभरातील ख्यातनाम व्यक्तींचे लेख दिले. या विशेषांकात डॉ. नरेंद्र जाधव, पद्मश्री डॉ. भंवरलाल जैन, विशाल शुक्ल, उदय देशपांडे, फ्रान्स्कि डिसोझा, डॉ. भा.र. साबडे, मिलिंद सोलापूरकर, मोहमद पाशा, राज घेल, हर्षल शहा, विकास वर्तक, हर्षदा साधले, स्वप्नील कुलकर्णी, डॉ. भारत झुनझुनवाला, सुभाष वैद्य, विश्वजित पाटील, अभय टिहक, जयंती घोष, गिरिश वासुदेव, डॉ. अच्युत गोडबोले, हर्ष काबरा, मोना भावसार, अर्थबोध पत्रिका, जॉन रीड, अर्थबोध पत्रिका, हिमांशू चौधरी, विलास पाटील, सचिन पाटील, स्वाती देसाई, मधुकर पुरंदरे, मंजिरी शिंदे, अॅड. असीम सरोदे, प्रा. अरविंद जोशी या सर्वांचे लेख आम्हाला मिळू शकले. कारण कोणीही व्यक्ती हा एकटा सर्व कांही करु शकत नाही. आपण सांघीक दृष्टीकोणातून कार्य करत असताना जागतिक मंदिच्या पार्श्वभूमीवर निश्चित मंदी ही एक चांगली संधी समजू शकते. युवकांची मरमर बऱ्याचवेळा कंपन्याच्या शिरजोरपणाही अडथळा ठरतो. मंदीतूनही कांही शिकायला हव आणि हे करत असताना रोग रेड्याला आणि औषध पकालीला करुन जमत नसत. आलेल्या परिस्थितीतून काय गमावल, काय कमावल याचाही विचार झाला पाहिजे. एकीकडे भारत महासत्ता होणार म्हणत असताना आय.टी. उद्योग हा कुठल्या अवस्थेत आहे, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर जागतिक मंदीचे काय परिणाम होतात, खरोखर आय.टी.चा रुबाब गेला का, मंदी म्हणजे काय, मंदीच्या मुळाशी जावून मंदीमुळे कोणते उद्योग संकटात आले, दिवाळखोरी आणि मंदी यातील फरक काय व डॉ. नरेंद्र जाधव यांनी म्हटल्याप्रमाणे, भारतात मंदी नव्हे इकॉनॉमिक स्लो डाऊन आहे. पर्यटन व्यवसाय, फॅशन व्यवसाय या सर्व गोष्टींचा विचार करत असताना येणाऱ्या काळात परिस्थितीनुसार आपल्याला नवी आव्हाने समर्थपणे पेलवण्यासाठी निश्चित हा विशेषांक एक संदर्भ ग्रंथ म्हणून देण्याचा आमचा प्रयत्न राहिला आहे. आजपर्यंत सर्वांनीच भरभरून प्रेम केल, सहकार्य केल, त्याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत.

पत्रकारितेचा वारसा नसताना एखाद्या व्यक्तीचा, पक्षाचा आधार नसताना जनाधारावर दै. मराठवाडा नेता वाटचाल करत आहे. एकीकडे जातदांडगी आणि धनदांडगी प्रवृत्ती वाढत असताना आम्हाला कधीही अडचणी आल्या नाहीत. आलेल्या अडचणी आमची निष्क्रीयता, आमची सुस्तीपणा, आमची मस्ती यामुळेच आलेल्या आहेत. आणि असलेल्या मंदीच्या काळात कठोर परिश्रम, जिद्द, आत्मविश्वास असेल आणि निश्चित उद्दिष्ट डोळ्यासमोर असेल, आणि स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे सदहेतू असेल तर अडवी येणारी माणस परमेश्वररुपी प्रवृत्ती, शक्ती, व्यक्ती त्याला आडव करतात. आपण कायम उभे राहतोत. आपण उभे राहत असताना आपले मित्र उभे राहिले पाहिजेत. आपले शत्रु उभे राहिले पाहिजेत, आपले सहकारी उभे राहिले पाहिजेत, आपला द्वेष आणि तिरस्कार करणारे उभे राहिले पाहिजेत. आपले कोणीच शत्रू नाहीत सर्वच आपले मित्र आहेत, सर्वचजण आपले आहेत. या भूमिकेतून दै. मराठवाडा नेता वाटचाल करीत आहे. अनेक व्यक्ती शक्तीरुपाने आमच्या पाठीशी आहेत. आद्यात्मिक शक्ती, धार्मिक शक्ती, आमची श्रद्धा, सर्वांचा विश्वास आणि सबुरी या भूमिकेतून वाटचाल करत असताना मराठवाडा नेताच्या प्रगतीबरोबर सर्वांची प्रगती व्हावी, सर्वांनी सुख, समाधान आणि आनंदाने राहावे याच भूमिकेतून जे जे आपणास ठावे, ते ते इतरांना सांगावे, शहाणे करुन सोडावे सकळ जण या भूमिकेतून आमचा प्रयत्न राहिलेला आहे. पण हे सर्वकांही घडत आहे हे सर्वांच्यामुळे आहे. यासाठी फक्त रामेश्वर बद्दर हा नाममात्र आहे. जीवनातील रंगमंचावर विविध भूमिका वठवत असताना एक व्यवस्थापक म्हणून आमची आहे, असच प्रेम, सहकार्य, सदर्भावना भविष्यातही राहव्यात व येणाऱ्या काळात जागतिक मंदिवर आपण सहज मात करु या, आणि विकासाची गंगा आम जनतेपर्यंत पोहोंचे या, हीच अपेक्षा.

**– प्रा. रामेश्वर बद्दर रेणापूरकर**



**२००८ च्या मध्यापासून जागतिक मंदीबाबत विविध माध्यमातून बरेच काही उलट-सुलट लोकांपुढे आल्याने नकळत एक प्रकारची धडकी छोटया उद्योजकांच्या मनात भरली गेली. खरे पाहता उद्योजकांना आव्हाने नवीन नसतात. जितकी आव्हाने तेवढी प्रगती असा हा खेळ असतो. मंदी नसताना सारेच उद्योग भरभराटीला आले असे नाही. भारतासारख्या बलाढय लोकसंख्या असलेल्या देशावर मंदीचा फारसा काही परिणाम होण्याची शक्यता मी सुरुवातीपासून नाकारत आलो. एक मात्र खरे की पूर्णत: निर्यातीवर अवलंबून असणाऱ्या व्यवसायावर याचा थोडाफार परिणाम झाला. मात्र असे उद्योग पार रसातळाला गेले असे नाहीत.**

**पद्मश्री डॉ. भंवरलाल जैन**
चेअरमन, जैन उद्योग समूह, जळगाव

# अन्वयार्थ जागतिक मंदीचा

२००८ च्या मध्यापासून जागतिक मंदीबाबत विविध माध्यमातून बरेच काही उलट-सुलट लोकांपुढे आल्याने नकळत एक प्रकारची धडकी छोटया उद्योजकांच्या मनात भरली गेली. कालांतराने याच्यातील नेमकी वस्तूस्थिती स्पष्ट होत गेल्याने अशा उद्योजकांना सावरायला वेळ लागला नाही. खरे पाहता उद्योजकांना आव्हाने नवीन नसतात. जितकी आव्हाने तेवढी प्रगती असा हा खेळ असतो. जागतिक मंदी नसताना सारेच उद्योग भरभराटीला आले असेही कुठे दिसत नाही. जागतिक मंदीचा भारतासारख्या बलाढय लोकसंख्या असलेल्या देशावर फारसा काही परिणाम होण्याची शक्यता मी सुरुवातीपासून नाकारत आले. नेमके झाले तसेच. हा, एक मात्र खरे की जे पूर्णत: निर्यातीवर अवलंबून होते त्या व्यवसायावर मात्र थोडाफार परिणाम झाला. मात्र असे उद्योग पार रसातळाला गेले असे नाही.

माध्यमातील जागतिक मंदीची आरोळी एवढी मोठी होती की उद्योजक गोंधळून जायला वेळ लागला नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर




अमेरिका, युरोप आणि इतर पाश्चिमात्य देशातील झालेल्या आर्थिक संकटांचा इतिहास तसा ताजा असल्याने उद्योजकांची ही स्थिती समजण्यासारखी होती. जैन इरिगेशचे विविध प्रकल्प पहावयास अनेक उद्योजकांच्या भेटीचा ओघ असल्याने जो तो प्रामुख्याने याच प्रश्नाभोवती घुटमळताना आढळायचा. जागतिक मंदिच्या काळात लघू आणि मध्यम उद्योजकांनी नेमके काय करावे? असा प्रश्न जवळपास सर्वांचाच असायचा. त्यांच्या चेहऱ्यावर काळजीचे भाव स्पष्ट दिसायचे. संक्रमणच मुळात काळजीचे असल्याने त्यांची ही स्थिती समजण्यासारखी आहे.

निर्यातीवर अवलंबून असलेले जगातील अर्थकारण, व्यवसाय आणि उद्योग हे अमेरिकेच्या वर्तुळाभोवती फिरणारे आहे. संपूर्ण जग अमेरिकेकडे एक बलाढ्य अर्थव्यवस्था आणि बाजारपेठ असलेला देश म्हणून पाहते. असे असतानाही तेथे एकाच वर्षात दिवाळखोरीची प्रकरणं सात लाखांवरुन १०.३० लाखाच्या घरात न्यायालयात दाखल झाल्याने प्रत्येकाच्या भूवया उंचावल्या गेल्या. याचा अर्थ, अमेरिकेतील दिवाळखोरीचा दर ३० टक्यांनी वाढला. एकूण प्रकरणापैकी जवळपास एक हजार प्रकरणे सप्टेंबर २००८ मध्ये दाखल झाली. विशेष म्हणजे यात लेहमनसारख्या तीस लाख कोटभ रुपयांची मालमत्ता असलेल्या आजस्त्र आणि नावाजलेल्या बँकेचाही समावेश झाला. यात आणखी एक धक्का म्हणजे इंटरनॅशनल मॉनिटरींग फंडच्या प्रमुखांनी २००९ हे वर्ष खरोखरीच जागतिक अर्थव्यवस्थेचे पाणीपत ठरणारे असल्याचले सांगितले. जगातल्या सवृच देशांच्या सरकारी यंत्रणेने उभे केलेले कर्जाचे डोंगर हे त्या त्या देशाच्या एकूण उत्पादनाच्या तुलनेत ४० ते ६० टक्यांपर्यंत जाऊन पोचलले आहे. म्हणजेच जवळपास सर्व देश दिवाळखोरीच्या उंबरठयावर उभे आहेत. अशा परिस्थितीत शासनाने अधिकाधिक गुंतवणूक केल्या शिवाय आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही, याबद्दल जवळपास सर्वच अर्थतज्ञ आणि या क्षेत्रातील दिग्गजांचे एकमत होताना दिसत आहे. यामुळे लहान-मोठ्या उद्योजकांना अस्वस्थता वाटत असली, तर त्यात वावगे ते काय ? विविध माध्यमातून या संदर्भात प्रसारित केल्या जाणाऱ्या माहितीच्या भडिमारावरुन या भीतीदायक वातावरणाला अधि खतपाणी मिळत आहे. ज्याचा शेअर मार्केशी काही संबंध नाही असेही लोक याची चिंता वाहताना तदसतात. त्यांना तरी दोष देऊन काय उपयोग ?

डॉलरगिरी

बदलत्या जागतिकीकरणानुसार आपण मुक्त आर्थिक धोरण स्विकारले आहे. या धोरणामुळे उद्योग जगताला फायदा झाला नाही, असे नाही. आर्थिक सुधारणेसाठी हे पाऊल तसे गरजेचे होते. मात्र आजचे जागतिक अर्थकारण लक्षात घेता आपली अर्थव्यवस्था त्या अर्थव्यवस्थेशी पूर्ण: समरुप झालेली नसल्याने अजून तरी आपण त्यांच्या एवढ्या धोक्याच्या वहणावर आहोत असे समजायचे कारण नाही. संपूर्ण युरोपमध्ये युरोच्या माध्यमातून चलन एकच झाल्याने याचा प्रत्यक्ष परिणाम तेथील सर्व घटकांत अधिक प्रमाणावर जाणवतो. तेथील सामान्य लोकही यात भरडले जात आहेत हेही तितकेच खरे. अमेरिकेत तर स्थिती याही पेक्षा गंभीर आहे.

आजवर जगातल्या बहुतांश बचतीचा फायदा केवळ अमेरिकेला मिळत आला आहे. याला कारण म्हणजे येनकेन प्रकारे जवळपास सर्वच देशांची बचत अमेरिकन ट्रेझेरीमध्ये ठेवण्यात आलेली आहे. ती बचत जर पहिल्या चार चौघांनी काढून घेण्याचे ठरविले तर ? अमेरिकेचे दिवाळे वाजलेच, पण त्याचबरोबर आजवरच्या इतिहासातला जगातला सर्वात मोठा आर्थिक धरणीकंपाचा धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. या साऱ्या परिस्थितीची जाण ठेऊन मला भेटणाऱ्या उद्योजकांना निराशेच्या खाईत ढकलायचे नव्हते. त्यांचे मनोधैर्य वाढावे असे बोलायचे होते आणि ते



सत्याला धरुन बोलायची माझी इच्छा प्रबळ होती.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने जणू दादागिरी करुनच डॉलर हेच देवाण-घेवाणाचे माध्यम असावे असा प्रघात पाउला. निसन यांच्या अध्यशीय काळात डॉलरचे पाठबळ असलेले सोने वेगळे केले गेले, यामुळे आजचा डॉलर हा केवळ कागदावरच आधारित झाला आहे. त्याला कोणत्याही प्रकारचे पाठबळ नाही. म्हणूनच, आजची जागतिक आर्थिक समस्या ही खऱ्या अर्थाने जागतिक डॉलर समस्या झाली आहे, हेही तेवढेच खरे. ग्लोबलयझेशनच्या ऐवजी खरे घडले ते डॉलरायझेशन ! या तुलनेत आपण भारतीय कित्येक पटीने बरे आहोत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपली अर्थव्यवस्था ही त्यांच्याशी पूर्णत: एकरुप झालेली नाही. याचा थोडाफार फटका बसणे हे मात्र अटळ आहे.

**निर्यातदारांनी पर्याय शोधणे आवश्यक**

अर्थकारणाच्या गप्पा आणि याची काळजी वाहणारा घटक प्रामुख्याने उच्च मध्यम वर्गामधला आहे. विशेषत्वाने ज्यांचा संबंध शेअर मार्केटशी आहे. खरं म्हणजे आपल्या देशातील जवळपास दहा कोटी लोकच शेअर मार्केटशी संबंधित

**विकासाचा आणि या आर्थिक मंदीचा फार जवळचा संबंध आहे असे म्हणता येत नाही. यात बड्या उद्योगांना हादरे बसणे स्वाभाविक आहे, मात्र लघुउद्योजक यात फार मोठ्या प्रमाणात भरडले जातील, अशी भीती बाळगायचेही कारण नाही. लघू उद्योग जर निर्यातप्रधान असले, तर याचा थोडा फार आघात होण्याची शक्यता आहे. निर्यातीचे प्रमाण कमी असल्यामुळे हा फरक जाणवेल, पण नफ्याचे प्रमाण कमी होणार नाही.**

आहेत. ११० कोटी लोकसंख्येत १० कोटी हा आकडा ९ टक्क्यांच्याच आसपास पडतो. उरलेल्यांचे पोट काही शेअर मार्केटवर अवलंबून नाही. इंडेक्स आणि सेन्सेक्स हा सामाजिक अंगाने संशोधनाचा विषय ठरेल. सेन्सेक्सचे गणित हे खरे म्हणजे स्वप्नातील जगणे आहे. माझी वर्थ व्हॅल्यू पाच लाखांची आहे, मार्केट कोसळल्यामुळे ती जर दोन लाखांवर आली, तर शोकात बुडायचे आणि ती सहा झाली तर आनंद मानायचा आणि हे सारे घरी बसल्या बसल्या करायचे असे या वर्गाचे जगणेआहे.

विकासाचा आणि या आर्थिक मंदीचा फार जवळचा संबंध आहे असे म्हणता येत नाही. यात बड्या उद्योगांना हादरे बसणे स्वाभाविक आहे, मात्र लघुउद्योजक यात फार मोठ्या प्रमाणात भरडले जातील, अशी भीती बाळगायचेही कारण नाही. लघू उद्योग जर निर्यातप्रधान असले, तर याचा थोडा फार आघात होण्याची शक्यता आहे. निर्यातीचे प्रमाण कमी असल्यामुळे हा फरक जाणवेल, पण नफ्याचे प्रमाण कमी होणार नाही. आपले उत्पादन निर्यातीपेक्षा येथे विकण्यासारखे असेल तर ते वाढेल. कारण परकीय चलन कर्जाची परतफेड करण्यासाठी गरजेचे असते. सरकारने या बाबत योग्य ती खबरदारी आणि नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

निर्यातप्रधान मोठ्या उद्योगावर जर काही लघू उद्योजक अवलंबून असतील, तर त्यांना त्रास होईल. गगित लक्षात घेता यातून सावरण्यासाठी अशा उद्योजकांनी आपले उत्पादन बदलता येत असेल तर जरुर प्रयत्न करावा. आहे त्याच मशिनवर किंवा थोड्या फार लहान-मोठ्या मशिन्स समाविष्ट करुन आपल्या उद्योगाचे विभाजन करता येईल. याद्वारे झालेले उत्पादन दुसऱ्या कुणाला देता येऊ शकेल. मात्र हे करतांना कोणतीही नवीन भांडवली गुंतवणूक करणे धाडसाचे ठरेल. उदाहरणार्थ, या काळात आपल्याला जर कमी भावात जागा मिळत असेल अथवा कमी व्याजदरावर कर्ज मिळत असेल तर अशा कामांसाठी पैसा टाकणेही आव्हानात्मक काम आहे. एवढेच नव्हे, तर आपल्याकडे



जर एखादे लग्नकार्य असेल तर तेही पाच-सहा महिने पुढे ढकलणे अधिक संयुक्तिक ठरेल. या स्थितीमध्ये बँकेचे कमीत-कमीकर्ज आणि जास्तीत जास्त भांडवल असणे गरजेचे आहे.

**व्याजाचे दर खाली हवेत**

जागतिक मंदीच्या परिणामामुळे अमेरिका आणि जपान येथील बँकांनी आपला व्याजाचा दर जवळपास शून्य टक्क्यांवर आणलेला आहे. युरोपमध्ये हा दर दोन टक्क्यांवर आहे. या तुलनेत भारतातील व्याजदर तसे जास्त आहेत. महागाई दर जर ६ टक्के असेल, तर जास्तीत-जास्त आठ टक्क्यांच्या वर व्याज नको, असा अर्थशास्त्राचा ढोबळमानाने नियम आहे. भारतातील व्याजदर तसे आणखी खाली येणे अपेक्षित आहे. व्याजाचे दर खाली आल्यानंतरच कोणतीही गुंतवणूक योग्य ठरेल.

महागाई दरानुसार व्याजाच्या दराचे अर्थशास्त्र भारतात चालतच नाही. आपल्याकडे भलतेच अर्थशास्त्र चालते ! कायदेही तसेच आणि त्यांची अंमलबजावणीही तशीच ! माझा एक वकील मित्र आहे. त्याने त्या कायद्यात आणखी भर घातली आहे. तो म्हणजे मन्नत ॲक्ट ! थोडक्यात दाढी कुरवाळणे, हाजी हाजी करणे. त्याही पलीकडचा उरलासुरला रिश्वत ॲक्ट ! भ्रष्टाचार. हा गंमतीचा भाग जरी सोडला, तरी अशा परिस्थितीत आपण स्टे लिक्विड स्टे कॅश हे धोरण स्वीकारलेले बरे. याचाच अर्थ अनावश्यक खरेदीचे निर्णय पुढे ढकलले पाहिजेत. आहे ते भांडवल जपून ठेवले पाहिजे. थोडक्यात कार्यालयाचे सुशोभीकरण, महागडे फर्निचर या बडेजावापोटी केले जाणारे खर्च आवरते घेतले पाहिजेत.

**गुणवत्ता जपणे आवश्यक**

गुणवत्ता कायम राखणे अथवा त्यात वाढ करणे हा यातून सावरण्याचा एक मार्ग आहे. दोन पैसा वेगळ्या मार्गाने कमावण्याच्या उद्देशाने गुणवत्तेत तडजोड करणारे उद्योजक अशा वेळी फार अधिक प्रमाणात नेमके फसतात. थोडा कम जादा चलता है, असे जर धोरण बाळगले, तर बुडण्याची भीती हमखास खरी ठरेल. असे न होऊ देता गुणवत्तेशी प्रामाणिक राहून उद्योजकांना आपल्या ग्राहकांना पटवून देता आले पाहिजे. माझे उत्पादन मी अशा पद्धतीने बनवितो आणि मला ते एवढ्या किंमतीत पडते. त्यावर मला फक्त एवढाच नफा आहे. हे लक्षात घेता मला किमान एवढी किंमत तरी अपेक्षित आहे. असे पारदर्शक आणि प्रामाणिकपणे सांगता आले पाहिजे. किमान एवढा नफाही जर मी कमवू नये असे जर वाटत असेल, तरही माझी द्यायची इच्छा आहे. ती यासाठी, की मी पूर्वीप्रमाणेच गुणवत्तापूर्ण मालाचे उत्पादन केले आहे. तुमच्याशी माझे असलेले ऋणानुबंध मला कायम टिकवायचे आहेत. या कठीण प्रसंगी आपण मदत कराल, अशी माझी खात्री आहे. या व्यवहारात कोणतीही तडजोड नसल्याचे सांगितल्यास समोरचे ८० टक्के लोक तुमचे ऐकतील. तुम्हाला समजून घेतील.

गुणवत्तापूर्ण मालाच्या उत्पादनासाठी खर्च हा स्वाभाविक आहे. या खर्चामुळे आर्थिक ताळेबंदाची जुळवाजुळव करताना उद्योजकांच्या नाकीनऊ येणे शक्य आहे. वेळेचे गणित पाळता न आल्याने पुरवठादार शेअर होल्डर्स, बँकर्स दुःखी होण्याची शक्यता असते. मात्र ज्या ग्राहकांच्या भरोशावर तुमचा व्यवसाय अवलंबून आहे, त्या ग्राहकाला गुणवत्तापूर्णच माल मिळाल्यामुळे तो गुणवत्तापूर्ण माल बघितल्यावर विसरुन जाईल. Price is quickly forgotton, quality is ever remembered असे गांधीजींनी म्हटले आहे. हे लक्षात घेता गुणवत्तेशी प्रतारणा न करता खेळत्या भांडवलाबद्दल उद्योजकाने सतर्क रहावयास हवे. मोठ्या व्याजाने खेळते भांडवल उभे करणेही धोक्याचे आहे. पुरवठादारांकडून कच्चा माल जेवढा उधारीवर मिळेल, तेवढाच घेऊन आपले उत्पादन व्यवस्थित करता येईल. याचा विचार करणे चांगले. या गोष्टी जर आपण आर्थिक मंदीच्या काळात बाळगल्या, तर या आव्हानांतून आपण सही सलामत बाहेर पडू एवढे नक्की !